N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** परभणी **P.S.(ठाणे):** मानवत
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0065 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/02/2024 20:02

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 14/02/2024
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 14/02/2024
**Time From (वेळेपासून):** 13:47 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:47 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 14/02/2024 **Time (वेळ):** 19:50 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 022
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 14/02/2024 19:50 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** त्रिमुर्ती धरम काटा,पाळोदी रोड, मानवत,मानवत

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** बालासाहेब मधुकरराव चंदेल

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1991

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अजिक्य अग्रो एजन्सी,मानवत,मानवत,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अजिक्य अग्रो एजन्सी,मानवत,मानवत,परभणी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8600698727

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गणेश किशनराव भोपे | | | 1. त्रिमुर्ती नगर,पाळोदी रोड, मानवत,मानवत,परभणी,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रु दराच्या चार चलनी नोटा | 2,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

2,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

**S.No.** (अ.क्र.) **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.)

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
फिर्याद

दिनांक 14/02/2024

मी बालासाहेब मधुकरराव चंदेल, वय 33 वर्ष व्यवसाय अजिक्य अॅग्रो एजन्सी मालक, मानवत, ता. मानवत, जि. परभणी. मो.क्र. 8600698727.

मी आज रोजी फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन अजिक्य अॅग्रो एजन्सी चालवितो. माझ्या एजन्सीचे माल ठेवण्यासाठी सर्व्हे क्र. 231 पाळोदी रोड मानवत या ठिकाणी नवीन गोदामाचे बांधकाम केले आहे. त्या जागेवर मला विद्युत जोडणी हवी असल्याने मी महावितरण चे मानवत येथील कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. प्रथम मला जागेचा सर्व्हे अहवाल घेवुन येण्यास सांगितले. मी आमचे परिसरातील लाईनमन श्री भोपे यांना भेटुन सर्व्हे अहवाल जमा केला असता मला मिटरसाठी एक पोल टाकावा लागेल असे सांगितले. मी पंधरा हजार रूपये खर्च करून एक इलेक्ट्रीक पोल टाकुन घेतला. त्यानंतर त्यांनी मला मिटर आणि प्रोसेसिंग फी, टॅक्स, सुरक्षा ठेव, कनेक्शन चार्ज, जी.एस.टी. असे कोटेशन म्हणुन दि. 08/02/2024 रोजी एकुण 5271/- आणि 142/- रूपये भरून घेतले आहेत.

दि. 09/02/2024 रोजी लाईनमन श्री भोपे यांना भेटुन मी भरलेले कोटेशनची पावती दाखविली असता '' तिन / चार दिवसात मिटर बसवितो '' पण तुम्हाला तिन हजार रूपये अतिरीक्त द्यावे लागतील असे लाईनमन श्री भोपे मला म्हणाले.

मागत असलेली रक्कम ही लाच आहे हे मला माहित आहे. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही. माझे त्यांचेशी भांडण तंटा किंवा कसलाही पैशाचे देवाण घेवाणीचा व्यवहार झालेला नाही. तसेच यापुर्वी माझे गोदामाचे सर्वे रिपोर्ट वेळेत देत नसल्यामुळे मी सहाय्यक अभियंता, महावितरण, मानवत यांचे कार्यालयात दि. 05/01/2024 रोजी आत्मदहन करणार असल्याबाबतचा अर्ज दिला होता..

उद्या दिनांक 13/02/2024 रोजी मी लाईनमन श्री भोपे यांना विद्युत मिटर बसविण्यास विनंती करण्यासाठी जाणार आहे. त्या दरम्यान त्यांनी तिन हजार रूपये लाचेची मागणी केल्यास किंवा त्यांचे वतिने इतर कोणी मागणी केल्यास, स्विकारल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी तक्रार दिली आहे.

त्यावरून लागलीच दिनांक 12/02/2024 रोजी पोलीस उपअधीक्षक श्री. अशोक इप्पर, एसीबी परभणी यांनी तात्काळ 1) श्री नामदेव रूस्तुमराव डुबे, वय 51 वर्ष, कनिष्ट लिपीक, सहायक समाज कल्याण आयुक्त कार्यालय, परभणी, रा. रचना नगर, परभणी, कारेगाव रोड, परभणी व 2) श्री रणजित सोमा भराडे, वय 35 वर्शे, व्यवसाय गृहपाल, षासकीय निवासी शाळा, पुर्णा, जि. परभणी दोन्ही नेमणूक सहायक समाज कल्याण आयुक्त कार्यालय, परभणी यांना शासकीय पंच म्हणुन उपलब्ध करून घेतले. सापळा अधिकारी यांनी दोन्ही पंचांची व माझी ओळख करून दिली. मी त्यांना माझी तक्रार तोंडी कथन केली. तसेच पोलीस उपअधीक्षक श्री. इप्पर यांनी माझी लेखी लिखीत तक्रार पंचांना वाचण्यास दिली. दोन्ही पंचानी माझी हस्तलिखीत तक्रार वाचून सदर तक्रारीवर सहया केल्या. त्यानंतर ठरल्याप्रमाणे उदईक दि. 13/02/2024 रोजी लोकसेवक यांची भेट घेवुन पुढील कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर दि. 13/02/2024 रोजी प्रत्यक्ष कार्यवाहीला पंच आणि सापळा पथकासह मानवत येथे नियोजित ठिकाणी पोहोचुन कार्यवाहीस सुरूवात करण्यात आली. आम्हाला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देवून दोन्ही पंच तसेच सापळा अधिकारी श्री इप्पर साहेब आणि माझे वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डरच्या सहायाने रेकॉर्ड केले. पडताळणी कार्यवाही दरम्यान मी व पंच क्र. 1 नामदेव रूस्तुमराव डुबे असे व्हाईस रेकॉर्डरसह भोपे लाईनमन यांना भेट घेण्यासाठी त्यांच्या मोबाईल फोनवर फोन करून विचारले असता नंतर कॉल करतो असे म्हणाल्यामुळे आम्ही थोडा वेळ वाट पाहीली परंतु त्यांचा फोन न आल्यामुळे माझ्या मोटारसायकलने महावितरण कार्यालय, मानवत येथे पंच क्र. 1 डुबे यांचेसह गेलो. त्यावेळी कार्यालयामध्ये भोपे हे हजर नव्हते त्यामुळे कार्यालयामध्ये हजर

असलेले लिपीक गव्हाणे यांची भेट घेतली मला नव्याने मिळणा-या विद्युत मीटर विशयी चौकशी केली असता गव्हाणे सरांनी मी कोटेशन वगैरे भरलेले असलेबाबत खात्री केली व मला विद्युत मीटर दिले. नंतर मी कार्यालयाचे बाहेर येवुन भोपे यांना फोन केला असता त्यांनी सांगितले की आज दुसरीकडे पोल बसविण्याचे काम चालु आहे. उद्या सकाळी दहा वाजता फोन लावतो तुमचे मीटर बसवुन देतो. त्यामुळे मी सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. मला आज भोपे साहेब हे प्रत्यक्ष न भेटल्यामुळे आणि फोनवर उद्या सकाळी दहा वाजता बोलावल्याने सर्वानुमते सदरील कार्यवाही उद्या म्हणजेच दि. 14/02/2024 रोजी करण्याचे ठरविण्यात आले.

आज दि. 14/02/2024 रोजी ठरल्याप्रमाणे सापळा पथक पंचासह मानवत येथील नियोजित ठिकाणी आले. व्हाईस रेकॉर्डर माझ्या गळ्यामध्ये चालु करून देवुन लटकवण्यात आले मी पंच क्र. 1 डुबे यांचेसह लाईनमन भोपे यांची भेट घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयाकडे जात असतांना अचानक वाटेत लाईनमन भोपे यांची भेट झाली व ते मला म्हणले पाच मिनीटामध्ये मी तुमच्या गोडावुनवर येवुन मिटर बसवुन देतो. ते गोडावुनला आल्यानंतर भेटी दरम्यान माझी व भोपे यांची माझे कामाचे अनुशंगाने चर्चा झाली. त्यावेळी भोपे यांनी माझे गोडावुन येथे माझे विद्युत मीटर बसवुन दिले. त्यावेळी भोपे यांनी मला विद्युत मीटर बसवुन परत जात असतांना मी त्यांना यापुर्वी मागीतलेल्या रक्कमेचा विषय काढला असता प्रथम ते तसे काही नसते असे म्हणुन मी कोणाला पैसे मागत नाही असेही म्हणाले व नंतर तुमची इच्छा असेल ते द्या नसता आम्ही निघालो तेव्हा मी त्यांना म्हणालो सांगा काय सांगायचे ते, त्यादिवशी तुम्ही म्हणाले होते ना ? तेव्हा भोपे म्हणाले तुमच्या आकाराने काहीही, त्यात म्हणणे नाही असे म्हणाले असता त्यावेळी मी किती एक हजार का म्हणुन विचारले आसता त्यावर लाईनमन भोपे यांनी हाताच्या दोन बोटाने ईशारा करून 2,000/- रूपये लाचेची मागणी केली. मी त्यांना पाळोदी रोडवरील शिवशंकर हॉटेल या ठिकाणी येण्यासाठी सांगितले.

त्यानंतर लागलीच मी व पंच क्र. 1 डुबे असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलोत. त्यावेळी सापळा अधिकारी श्री इप्पर साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमधील पडताळणी कार्यवाही दरम्यानची माझे व भोपे यांचे झालेले संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकले. त्यावेळी लाईनमन भोपे यांनी लाचमागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने त्यांचेवर सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर सापळा कार्यवाही दरम्यान उपअधीक्षक श्री. इप्पर साहेब यांनी मला, पंचांना व सापळा पथकास प्रत्येकाच्या कामाबाबत सुचना दिल्या. तसेच अॅंथ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे गुणधर्म आणि वापरा बाबत माहिती दिली. त्याबाबत पोशि/कल्याण नागरगोजे यांचे करवी प्रात्यक्षीक करून दाखविण्यात आले. मी हजर केलेल्या 2,000/- रूपयांना ( ज्यामध्ये 500/- रू दराच्या चार चलनी नोटा) पोशि/कल्याण नागरगोजे यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावून लाईनमन भोपे, महावितरण कार्यालय, परभणी यांना देण्यासाठी माझे अंगावरील शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशात व्यवस्थीत ठेवून दिली. त्यानंतर मी व पंच क्र. 1 नामदेव रूस्तुमराव डुबे असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणाहून माझ्या मोटारसायकलने लाईनमन भोपे यांना लाचेची रक्कम देण्यासाठी ठरल्याप्रमाणे शिवशंकर हॉटेल येथे जाण्यासाठी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरसह निघालो. आमचे पाठोपाठ सापळा पथक मोटारसायकलने निघाले. मी व पंच क्र. 1 डुबे असे पाळोदी रोड, मानवत येथून षिवषंकर भोजनालय येथुन फोन लावला असता त्यांनी त्रिमुर्ती धरम काटयाजवळ बोलावल्यामुळे तेथे पोहंचलो. सापळा पथक आमचे पाठोपाठ अंतर ठेवुन त्रिमुर्ती धरम काटयाजवळ आले आणि आजुबाजूला आमचेवर लक्ष ठेवून थांबले.

मी व पंच क्र. 1 डुबे यांनी लाईनमन भोपे यांची पाळोदी रोड वरील त्रिमुर्ती धरम काटा येथे भेट घेतली. त्यावेळी मी माझे कामाचा विषय काढला असता भोपे यांनी लाच रक्कम मागितल्याने मी पंच क्र. 1 डुबे यांचे समक्ष 2,000/- रू लाचेची रक्कम माझे शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशातुन काढून भोपे यांना दिली. आणि त्यांना म्हणालो आपण बोटाने इशारा केल्याप्रमाणे दोन हजार रूपये देत आहे, पुन्हा काही काम पडल्यास बसवुन द्या तेव्हा भोपे यांनी 2,000/- रू. स्वतः स्विकारून त्यांच्या शर्टच्या डाव्या खिशामध्ये ठेवल्यामुळे माझे जवळील ब्लुटुथ गळयामधुन काढुन पुर्वनियोजीत इशारा केला. तो इशारा पाहून सापळा पथकातील सर्व स्टाफ तेथे आले आणि सापळा पथकाने भोपे, लाईनमन यांना ताब्यात घेतले व 13.47 वा. माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद केला. यावेळी पोलीस उपअधीक्षक श्री इप्पर साहेबांनी भोपे यांना त्यांचे पुर्ण नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव गणेश किशनराव भोपे, वय 33 वर्ष सिनीयर टेक्नीशियन, महावितरण, मानवत रा. त्रिमुर्ती नगर, पाळोदी रोड, मानवत असे सांगितले. त्यानंतर तिथे झडती घेण्यासाठी व अल्ट्राव्हायलेट प्रकाशात तपासणी करण्यासाठी सुरक्षीत जागा नसल्यामुळे पंचासह पोलीस ठाणे मानवत येथे येवुन तेथील बीट क्र. 1 च्या रूममध्ये पंचासमक्ष लाचेची रक्कम कोठे आहे असे भोपे यांना विचारले असता त्यांनी शर्टच्या डाव्या खिशातुन अॅन्थ्रासिन पावडर लावलेली रक्कम 2,000/- रूपयांची रक्कम काढुन दिली. नोटांवर आणि भोपे यांच्या हातांच्या बोटांवर, त्याच्या शर्टच्या डाव्या खिशामध्ये अॅल्ट्राव्हायलेट लॅम्पचा प्रकाश टाकला असता हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर सापळा अधिकारी यांचे सुचनेनुसार पंच क्र 2

भराडे यांनी त्या नोटा स्वतःकडे घेतल्या. सदर नोटांचे नंबरची पडताळणी केली असता ती लाचेची रक्कम असल्याची खात्री झाली आहे.
दि. 12/02/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी येथे मी दिलेल्या तक्रारीवरून आज दि. 14/02/2024 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक गणेश किशनराव भोपे, वय 33 वर्ष, सिनीयर टेक्नीशियन, महावितरण, मानवत रा. त्रिमुर्ती नगर, पाळोदी रोड, मानवत यांनी माझे पाळोदी रोडवरील अजिक्य अॅग्रो एजन्सीच्या गोडावुन येथे नवीन विद्युत मीटर बसवुन दिल्याचे बक्षीस म्हणुन पंचासमक्ष 2,000/- रूपये लाचेची मागणी करून 13.47 वा. त्रिमुर्ती धरम काटा, पाळोदी रोड, मानवत येथे पंचासमक्ष स्विकारली आहे. म्हणून त्यांचे विरूध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता फिर्याद देत आहे. माझी फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली आहे. मी ती वाचून पाहिली माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष फिर्यादि दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले)**:**

DIPAK LAXMAN DANTULWAR(I (Inspector)) / PCMH94137 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव)**:**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** DIPAK LAXMAN DAN
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PCMH94137